# स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धन

**महादेव सोपानराव घाटूळ**
*संशोधक विद्यार्थी*
*डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर.*

***सारांश***
*निसर्गाच्या विरोधात जाऊन आपण कोणताही विकास साधू शकत नाही. निसर्गच मनुष्याला अन्न वस्त्र निवारा देणारा एकमेव दाता आहे. परंतु मानवाने निसर्गाचे अमर्याद शोषण सुरू केले आहे. झाडांची अंदाधुंद कत्तल करणे मोठ्या प्रमाणावर जंगल तोड करून त्यावर वस्ती उभारणे, परिसर अस्वच्छ ठेवणे नदी नाल्यामध्ये प्रदूषित पाण्याचा प्रवास सोडणे यामुळे निसर्गाची अतोनात हानी होत आहे. ही हानी टाळण्यासाठी आपला परिसर स्वच्छ ठेवून पर्यावरण संतुलन राखणे काळाची गरज बनली आहे. अन्यथा भविष्यात त्याचा वाईट परिणाम मानवी जीवनावर होऊ शकतो.*

**प्रस्तावना**

ग्रामीण विकासामध्ये पर्यावरण समतोल राखणे म्हणजे एक मोठे आव्हान आहे. त्याचा तातडीने विचार करण्याची गरज आहे. पृथ्वीवर अनेक नैसर्गिक आणि मानवनिर्मित घटकांचा परिणाम होऊन बऱ्याच पर्यावरणीय समस्या निर्माण झाल्या आहेत. या समस्याचा विपरीत परिणाम सर्व सजीवावर होत असतो. हे जीव टिकविण्यासाठी आणि मानवाच्या जीवनाची गुणवत्ता चांगली राखण्यासाठी पर्यावरण स्वच्छता आवश्यक आहे. जैवविविधतेचे जतन व संवर्धन करणे मानवी अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी अत्यंत गरजेचे आहे. वसुंधरेचे देणे फेडण्यासाठी पर्यावरण रक्षण, संवर्धन व स्वच्छता करण्याची जबाबदारी सर्वांची आहे. निसर्ग हे मानव, वन्यजीव जलचर प्राणी, पक्षी गंगा आणि वनस्पती यांना लाभलेले मोठे वरदान आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

1. स्वच्छता आणि पर्यावरण यांचा सहसंबंध अभ्यासणे.
2. अस्वच्छतेमुळे पर्यावरणावर होणारा परिणाम अभ्यासणे.
3. पर्यावरण संवर्धन करण्यासाठी उपाययोजना करणे.
4. मानवाला प्रदूषणाच्या परिणामापासून वाचवणे.

**संशोधन आराखडा**

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा वापर करण्यात आलेला आहे. तथ्य संकलनासाठी प्रस्तुत संशोधन विषयाशी संबंधित सर्व संदर्भ ग्रंथ, पुस्तके,शोध पत्रिका, नियतकालिके, वर्तमानपत्रे तसेच प्रकाशित, अप्रकाशित साहित्य व इंटरनेटचा आधार घेण्यात आलेला आहे.

**स्वच्छता आणि पर्यावरण संकल्पना**

सजीवांच्या नैसर्गिक परिसरास पर्यावरण असे म्हणतात. वैज्ञानिक परिभाषेत पर्यावरण या संज्ञेत वनस्पती अथवा प्राणी ज्या नैसर्गिक परिसरात जगतात वाढतात तेथील हवा, पाणी, इतर सजीव, प्रजन्यमान, तापमान इत्यादी सर्वांचा समावेश होतो. पर्यावरणाचे शिलावरण, जलावरण आणि वातावरण या मुख्य वैज्ञानिक घटकातील सतत चालू असणाऱ्या प्रक्रिया व आंतरक्रिया यांचा परिणाम पर्यावरण होय. सजीवांना त्यांच्या जीवन संघर्षासाठी आणि उत्क्रांतीमध्ये सभोवतालच्या पर्यावरणाशी जुळवून घ्यावी लागते. जो बदल स्वीकारतो तोच तक धरून राहू शकतो. पर्यावरण आणि मानव यांचे परस्पर संबंध नेहमी बदलत असतात. पर्यावरणाचे रक्षण करणे सर्वांची जबाबदारी आहे. विकासाच्या नावाखाली पर्यावरणामध्ये मानवी हस्तक्षेप वाढणे, जैव विविधता रास, हवामान बदल, जागतिक तापमान वाढ यासारख्या समस्या निर्माण झाल्या. पर्यावरण समस्या सोडवण्यासाठी युनायटेड नेशन इन्व्हरमेंट प्रोग्राम UNEP ची स्थापना करण्यात आली. त्यामध्ये जागतिक तापमान वाढीमुळे पृथ्वीवर परिस्थितीकीय तंत्रावर विपरीत परिणाम करून हवामान बदलाची समस्या निर्माण होऊ शकते.

पर्यावरण संवर्धन विषयक उपक्रम

1. स्टॉक होम परिषद 1972.
2. पहिले हवामान विषयक जागतिक परिषद 1979.
3. अँड इंटर गव्हर्मेंटल पॅनल ऑन क्लायमेट चेंज आयपीसीसी 1988.
4. संयुक्त राष्ट्र संघाची पर्यावरण विषयक नरोबी परिषद 1982.
5. रिओ परिषद 1992.

6. क्युटो परिषद 1997.
7. जागतिक शाश्वत विकास परिषद 2002.

पर्यावरणाचे रक्षण आणि संवर्धन व्हावे यासाठी 5 जून 1972 रोजी स्वीडन मधील स्टॅक होम येथे आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेमध्ये 130 देशांनी प्रतिनिधित्व केले होते. या परिषदेमध्ये पर्यावरण विषयक चर्चा घडुन येऊन पर्यावरण हा विषय शालेय अभ्यासक्रमामध्ये समाविष्ट करण्यात आला. 5 जून हा दिवस 1974 पासून जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा केला जाऊ लागला. सन 2022 साठी जागतिक पर्यावरण दिनाची थीम "फक्त एक पृथ्वी" या घोषवाक्येने जागतिक पर्यावरण दिन साजरा केला. या कार्यक्रमाचे आयोजन स्वीडन येथे करण्यात आले होते.

भारतात स्वच्छता मोहिमेची सुरुवात

संत गाडगे महाराजांनी स्वतः हातात खराटा घेऊन कृतीतून स्वच्छतेचा मंत्र जगाला दिला. त्याचप्रमाणे संत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेमध्ये स्वच्छतेचा उपदेश केला. तेव्हापासून स्वच्छता मोहिमेची खरी सुरुवात झाली. भारतात 1954 ला पहिल्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत ग्रामीण भागासाठी स्वच्छता कार्यक्रम सुरू केले. 1981 च्या जनगणनेनुसार भारतात स्वच्छतेचे प्रमाण फक्त 1 टक्के इतके होते. 1981 ते 1990 या कालावधीमध्ये स्वच्छतेवर भर देण्यात आला. भारत सरकारने 1986 ला केंद्रीय ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम (CRPF) सुरू केले. 1999 ला ग्रामीण स्वच्छतेसाठी आयोगाची स्थापना करण्यात आली. नंतर 2012 मध्ये तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी 'निर्मल भारत अभियान' सुरू केले. 2 ऑक्टोबर 1914 ला महात्मा गांधी यांच्या जयंतीचे अवचित्य साधून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वच्छ भारत अभियानाची सुरुवात केली.

**स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व**

प्रत्येक व्यक्तीला स्वच्छता आणि निसर्गाच्या सानिध्यात स्वतःचा वेळ व्यतीत करायला नेहमी आवडत असतो. आपल्या आजूबाजूला असलेले वृक्ष आपल्याला असंख्य गोष्टी प्रदान करतात. वातावरणातील कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात व आपल्याला जीवनावश्यक असलेला ऑक्सिजन प्रदान करतात. वृक्ष हे पाऊस पाडण्यासाठी पर्यावरण संतुलन राखण्यासाठी खूप महत्त्वाची भूमिका बजावत असतात. जल प्रदूषण, वायू प्रदूषण यामुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडत आहे. त्याचा परिणाम नैसर्गिक बदल होत आहे, ओझोनचा स्तर कमी होऊन जागतिक तापमान वाढ ही समस्या भेडसावत आहे. आपण नवीन तंत्रज्ञान निर्माण केले आहे. जे दिवसेंदिवस पर्यावरणाचा रास करीत आहे. नैसर्गिक हवा, पाणी आणि माती ज्याप्रकारे प्रदूषित होत आहे. त्यावर असे वाटते की एक दिवस पर्यावरणाचे मोठे नुकसान होऊ शकते. रासायनिक खतामुळे जमिनीची सुपीकता नष्ट होते. तेच रासायनिक घटक दररोज अन्ना मधून आपल्या शरीरात जमा होत असून त्याचा परिणाम कॅन्सर सारखे रोग व्यक्तीला जडत आहेत. औद्योगिक कारखान्यामधून निघणारा हानिकारक धूर नैसर्गिक हवा प्रदूषित करते. त्याचप्रमाणे अशुद्ध पाणी नदीनाले मध्ये सोडल्यामुळे पाणी प्रदूषणाची समस्या देखील निर्माण झालेली आहे. यावर उपाय म्हणून पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी परिसर स्वच्छ ठेवणे, वृक्षारोपण करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

**निष्कर्ष**

पर्यावरण समतोल राखण्यासाठी स्वच्छतेबरोबर पर्यावरण संवर्धन करणे गरजेचे आहे. भविष्यात आधुनिक तंत्रज्ञानामुळे नैसर्गिक संसाधनाचा गैरवापर होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. वृक्षतोडीवर शासनाने कठोर कायदे केले पाहिजे. यासोबतच पर्यावरण स्वच्छ ठेवून तापमान बदलावर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. पर्यावरण संवर्धन करणे हे आपले कर्तव्य आहे.

**संदर्भ**

1. लक्ष्मणशास्त्री जोशी 1976, 'मराठी विश्वकोश खंड' 2 महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई.
2. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज 2004, ' ग्रामगीता' सुदामजी सावरकर आधार चंद्रपूर.
3. महात्मा गांधी 1997, 'माझ्या स्वप्नातील ग्रामीण भारत' मराठवाडा खादी ग्रामोद्योग समिती नांदेड 2.
4. https://:www.uprpsp.com.